No. of Printed Pages : 5

**एफ.एम.टी.-01**

# BDP / BCA / BTS

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

## दिसम्बर, 2022

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*वेळ : दोन तास* *अधिकतम गुण : 50*

***सूचना : सर्व*** *प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.*

**1.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*

(क) कोरोना साथीचे सार्वत्रिक परिणाम

(ख) पाणी म्हणजे जीवनच

(ग) सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व

(घ) माझा आवडता कवी

**2.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*

(क) तुकाराम महाराज विठ्ठलावरील अनन्य भक्ती कोणकोणत्या दृष्टांतांनी व्यक्त करतात ?

(ख) कवीला या सृष्टीतून वगळल्यास काय होईल असे केशवसुतांना वाटते ?

(ग) कोळसेवाला हा नव्या मनूतील गिरिधर पुतळा आहे असे मर्ढेकर का म्हणतात ?

(घ) 'कातरवेळ' या कथेत आक्काचे माहेरी कसे स्वागत झाले ?

**3.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : *6*

(क) 'वळीव' कथेत सखुबाने सासरे अचानक वारल्याची बातमी सांगितल्यावर तात्या देसायाच्या मनाची अवस्था कशी झाली ?

(ख) पाटलाच्या माणसाने चेलम्यातील पाच ओंजळी पाणी फेकून मगच बैलांना पाणी का पाजले ?

(ग) आकाशाला आशय आणि सौंदर्य देण्याचे सामर्थ्य माणसाच्या मनामध्येच आहे असे शिरवाडकर का म्हणतात ?

(घ) सांबर न मारण्यात कुंजाचे वेगळेपण कसे प्रकट होते ?

**4.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर टीपा लिहा : *6*

(क) 'गुंड्याभाऊचे दुखणे' या कथेतील स्वभावनिष्ठ विनोद

(ख) भाऊराव पाटलांची 'स्वावलंबी शिक्षणा' ची संकल्पना

(ग) न्यायालयाचे महत्त्व

(घ) बालगंधर्वांचे रंगभूमिवरील दर्शन

**5.** 'शक्य' क्रियापद आणि 'संयुक्त' क्रियापद म्हणजे काय ते सांगून त्यांचे प्रत्येकी एक एक उदाहरण वाक्यात उपयोग करून लिहा. *5*

**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा : *5*

(क) विद्या विनयेन शोभते

(ख) मान सांगावा जना अपमान सांगावा मना

(ग) मरावे परी कीर्तीरूपे उरावे

**6.** खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : *3*

(क) भेलकांडू लागणे

(ख) सुताने स्वर्ग गाठणे

(ग) पावले जड होणे

(घ) काळीज उलटे असणे

(ङ) डोळे पांढरे करणे

**किंवा**

खालीलपैकी ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा : *3*

(क) गाढवाला गुळाची चव काय !

(ख) पडत्या फळाची आज्ञा

(ग) चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे

(घ) भीड भिकेची बहीण

(ङ) बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर

**7.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : *4*

(क) ललित वाङ्मयाचा आनंद घेण्यासाठी वाचकही समानधर्मा किंवा अनुभवसमृद्ध असावा लागतो असे ना.सी. फडके का म्हणतात ?

(ख) बौद्ध भिक्षुसंघ म्हणजे पार्लमेंट असे डॉ. आंबेडकर का म्हणतात ?

(ग) भाऊराव पाटलांनी स्वावलंबी शिक्षणाची योजना का कार्यवाहीत आणली ?

(घ) समाजवादी समाजव्यवस्था आली तर स्त्री-मुक्तीसाठी पोषक वातावरण तयार होईल, असे छाया दातार का म्हणतात ?

**8.** खालील इंग्लीश उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : *4*

The folktales are passed down from generation to generation forming part of the cultural heritage of a society. Malinowski proposed a three-way classification and distinguished between myth, legend and fairy tale. The first of these, he suggested, represents a statement of a higher and a more important truth of a primeval reality. As such it is regarded as sacred. Fairy stories on the other hand are simply entertainment and nobody attaches any special significance to them and nobody believes them to be true. Legends, however, are believed to be true historical accounts.

**9.** खालील उताऱ्याचा सारांश लिहा : *4*

आमच्या देशातील उच्च शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे. शिक्षण आपल्याला समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोहोचवायचे असेल तर ते परक्या भाषेतून तेथपर्यंत जाणार कसे ? दीडशे वर्षे या देशावर इंग्रजांचे राज्य होते, ते गेल्यानंतरही आम्ही इंग्रजीतून शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण शेवटी आज किती लोकांना इंग्रजी येते ? म्हणजे नवा विषय समजण्याइतके, वर्तमानपत्रातील मथळे वाचण्यापुरते नव्हे ! शेकडा चार टक्के लोकांनाही येत नाही. म्हणजे या

बाबतीत देशातले शहाळाव टक्के लोक या देशामध्ये ज्ञानाला परके आहेत, असा याचा अर्थ होतो. या देशामध्ये आपल्याला लोकशाहीची वाढ करावयाची आहे, आपल्याला सामान्य माणसाला मोठे करावयाचे आहे. पण अशाने सामान्य माणूस मोठा होणार कसा ? त्याची सुरुवातीची सगळी शक्ती जर परकी भाषा शिकण्यात निघून गेली तर त्याची प्रगती कशी होणार ? त्यामुळे सामान्य माणसापर्यंत महत्त्वाचा विचार किंवा ज्ञान कधी पोचलेच नाही. थोडक्यात सांगायचे झाले तर ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही.